श्री राममारुतीमहाराज.



२१७४०

# प्रस्तावना.

श्रीरामचंद्राय नमः ।

बालमित्र आयुर्वेदभूषण ॥ हरि रामचंद्र
पाठक जाण ॥ वैद्यकीमार्गी अति प्रवीण ॥
धन्वंतरी दुसरे ॥ १ ॥ वैद्य जैसे कविही
तैसे ॥ काव्यीं प्रसार पूर्ण दिसे ॥ इच्छा
त्यांसी झालीसे ॥ संत-चरित्र लिहावें ॥ २ ॥
श्रीराममारुती महाराज ॥ परब्रह्म कैवल्य-
राज ॥ नाम सुचविलें सहज ॥ मान्य झालें
त्यासी ॥ ३ ॥ स्फूर्ति श्रीराममारुतींची ॥
रसाळ वाणी हरिभाऊंची ॥ चरित्रलेख सह
र्षी ॥ उत्कृष्ट उतरला ॥ ४ ॥ तो हा संत
...ावरी ॥ अर्पितां अतिमोदलहरी ॥ उठती

अंतःसरोवरी ॥ गोड झालें पाहिजे ॥ ५ ॥
येथें बहुतांचें साह्य झालें ॥ त्या सर्वांचे उप-
कार भले ॥ ऋण शिरावरी राहिलें ॥ कदा
काळीं फिटेना ॥ ६ ॥ त्या सर्वांचा नाम-
निर्देश ॥ येथें कराया न अवकाश ॥ कांहीं
थोडीशीं विशेष ॥ उल्लेख संक्षिप्त करी-
तसें ॥ ७ ॥ छवी श्रीराममारुतींची ॥ ही कृपा
दत्तात्रय वामन गुप्ते यांची ॥ फोटो देऊनी
ग्रंथसौंदर्याची ॥ शोभा त्यांनीं वाढविली
॥ ८ ॥ ॲडव्होकेट प्रेस म्यानेजर ॥ नाना
भाई गोविंद चित्रे उदार ॥ ठसा केला त्यांनीं
सुंदर ॥ अल्पावधी माझारी ॥ ९ ॥ विनायक
सिताराम जयवंत॥श्री महाराजांचे प्रेमळभक्त॥
मुद्रण कार्यी साह्य करति ॥ प्रकाशनाला-
गूनी ॥१०॥ आणिक लहानथोर ॥ आश्रयदाते
होतील फार ॥ त्या सर्वांचे फार आभार ॥

काव्य ४२१

त्यांसी करूं वंदन ॥ ११ ॥ बालमित्र हरि-
भाऊ ॥ प्रेमें वाटती ज्येष्ठ भाऊ ॥ ज्यांनीं
केला हा उठाऊ ॥ भिषग्वर्य कविराज ॥ १२ ॥
खर्च वजा जातां फायदा ॥ समाधी-फंडांत
करावा आदा ॥ स्वयें सांगितलें नको फाय-
दा ॥ थोर मन थोरांचें ॥ १३ ॥ त्यांचे हे
तों उपकार ॥ थोर झाले माझेवर ॥ आणखी
आपुल्या ज्ञातीवर ॥ न फिटती कालत्रयीं
॥१४॥ श्री सरस्वती मुद्रणालयीं ॥ काम झालें
सुबक पाहीं ॥ अवधि थोडा वेळ नाहीं ॥ त्वरें
काम पूर्ण केलें ॥ १५ ॥ शास्त्री निपुण मुद्र-
णाधिकारी ॥ प्रुफें वाचिलीं त्यांनीं सारीं ॥
जहाले तयांचे उपकार भारी ॥ किती ह्मणूनी
वर्णावे ॥ १ ॥ शके १८४५ शीं ॥ रुधिरोद्गारि
नाम संवत्सराशी ॥ चैत्र शुक्ल पंचमीशी ॥
लेखनारंभ जाहला ॥ १७ ॥ पुढें श्रावण कृष्ण

१२शी ॥ पंचाध्यायीं चरित्राशीं ॥ पुरें करवु-
नियां कोपरिवाशी ॥ सदानंदा नमीतसें ॥१८॥

श्रा. कृ. १२ शके १८४५
ता. ७माहे सपटेंबर १९२३.
माजगांवकरांचें घर, कुंभार
वाडा दादर मुंबई, १४

भास्कर गोपाळ
ताम्हणे

॥ श्री ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगणेशा विघ्नहरा ॥
पाशांकुश शोभति तुझिया करा ॥ वरदमूर्ते
कृपा करा ॥ कवनीं वरद व्हावें गा ॥ १ ॥
ॐकार प्रणतवत्सला ॥ साकारत्वें शोभला
भला ॥ भक्तभावना पुरवावयाला ॥ अनेक
रूपें घेसी पैं ॥ २ ॥ गजवदना गणनायका ॥
गौरी कुमरा विघ्नहारका ॥ मूषकवाहना
सिद्धिदायका ॥ नमन माझें तव पदीं ॥ ३ ॥
नमन माझें देवी सरस्वती ॥ तव पदीं देईं
सहज स्फूर्ती ॥ श्रीराममारुति चरित्रामृतीं ॥
भक्तवत्सले देईंगे ॥ ४ ॥ हे विद्यादेवी मयूर-
वाहने ॥ वीणारवीं ब्रह्म गाने ॥ तल्लीनत्वें
वेददानें ॥ तव भक्तांलागीं तूं ॥ ५ ॥ नमन
माझें श्रीगुरुवर्या ॥ बुद्धि द्यावी इच्छित
कार्या ॥ श्रीवासुदेवानंद सद्गुरु धैर्या ॥ व्हावा

आपुला आशिर्वाद ॥ ६ ॥ आजवरी अनेक
संत झाले भारतीं ॥ आणिकही पुढें होती ॥
जे पतितजनां उद्धरती ॥ सहजपणें पूर्णत्वें
॥ ७ ॥ ते सर्वही गुरुस्थानीं ॥ तुजसम
असती हें मानीं ॥ न्यूनाधिकता मनीं नाणीं ॥
अनेक रूपें ऐक्यत्वें ॥ ८ ॥ ब्रह्मा विष्णु
महेश ॥ त्रिगुणात्मक वंद्य अहर्निश ॥ सृष्टि-
चक्रा सावकाश ॥ सर्व जगतीं राहोन ॥ ९ ॥
अंशात्मक अवतार ॥ धर्मस्थैर्या घेसीं परि-
कर ॥ जडदेहीं वसोनि सुंदर ॥ उद्धरशी
जगातें ॥ १० ॥ श्रीपाद श्रीवल्लभ नरहर ॥
एकनाथ माणिकप्रभु लीलावर ॥ पंचम
स्वामी अक्कलकोटकर ॥ वासुदेवानंद अव-
तार पैं ॥ ११ ॥ यापरी दत्त अवतार ॥
झाहले आजवरी साचार ॥ दाशरथी-भक्त
हनुमंत वीर ॥ सेव्यसेवक भावें पैं ॥ १२ ॥

राम दाशरथी रूप एक ॥ अंजनीसुत हनु-
मंत आणिक ॥ एक सेव्य दुसरा सेवक ॥
परी तादात्म्यरूपें एकची ॥ १३ ॥ अभेदत्वें
भेद न उरला ॥ अहंभाव सर्व मावळला ॥
अंतरींच्या अंतरंगा मुरला ॥ तेथें कैचें
दुजेपण ॥ १४ ॥ जैसा घट भरलासे कूपो-
दकानें ॥ नदी सरोवर पाहून नयनें ॥ ओतून
त्यांतील परत घेणें ॥ परी जलतत्व एकचि
॥ १५ ॥ कूप तलाव नदी सरोवरें ॥ स्वरूपें
दिसती वेगळे सारे ॥ नामनिर्देश विविध-
प्रकारें ॥ परी जलशब्द एकचि ॥ १६ ॥
तत्वभावें पाहतां एक ॥ अज्ञानत्वें दिसती
अनेक ॥ परी ज्ञानदृष्टी पाहातां देख ॥ भिन्नत्व
कोठें दिसेना ॥ १७ ॥ सर्व पाहता तो आहे ॥
सर्व सृष्टी त्याचीच पाहे ॥ अहंभावावरूनि
लवलाहे ॥ पाहतां दिसे तोचि पैं ॥ १८ ॥

सारा मायाजालाचा पसारा ॥ सृष्टीमाजी भरला सारा ॥ त्यायोगें षड्रिपूंचा वारा ॥ प्राणिमात्रीं वसतसे ॥ १९ ॥ लोकीं वाढतां अज्ञान तिमिर ॥ अधर्मरत होती नारीनर ॥ तयां धर्म दावावया परिकर ॥ सन्त महात्मे जन्मती ॥ २० ॥ त्यांचीं कामें तेच जाणती ॥ जन अज्ञानें ना ओळखिती ॥ वेडा पिसा भ्रमी ह्मणती ॥ अनुभव पटे तोंवरी ॥ २१ ॥ जैसें सर्प वृश्चिक दंशें करून ॥ विव्हळे परी औषधि जवळी असतां जाण ॥ इतुक्यामाजीं जाणता सज्जन ॥ तीच लावी बरें करी ॥२२॥ किंवां क्षुधातृषेनें आकळला ॥ कंदमुळांनीं प्रदेश भरला ॥ जाणता दावी उपयोगाला ॥ तेव्हां आकंठ तृप्त होय ॥ २३ ॥ तैसी संत महात्म्यांची स्थिति ॥ प्रसंगें जन त्या ओळखिती ॥ अभेदत्वें उपकार करिती ॥ जनते-

वरी दयेनें ॥ २४ ॥ जाहले संत सर्व वर्णांत॥
प्रत्युपकारें कीर्तिभूत ॥ त्या दरेकीं कीला
अद्‌भुत ॥ एक दुजाशीं मेळ नाहीं ॥ २५ ॥
महाराष्ट्रीं यवन मातले ॥ जनांस नाडिती
धर्मछलें ॥ त्यावेळीं उद्भवलें संताळें ॥ ज्ञान-
देवादि रामदास ॥ २६ ॥ ज्ञानदेव चांगदेव ॥
तुकाराम नामदेव ॥ सगन सांवता सेना
न्हाव ॥ ऐसे जाहले कितीतरी ॥ २७ ॥ दरेकें
अनेक प्रकारें ॥ धर्मतत्वें दाविलीं साचारें ॥
परतवोनि नयमार्गीं केलें बरें ॥ जनबुद्धि
ओळखोनी ॥ २८ ॥ धर्मतत्वें बीजापरी ॥
भूमीची पाहोनि मगदुरी ॥ शहाणा कुणबी
जाणोनी पेरी ॥ तीच स्थिति धर्माची ॥ २९॥
श्रीरामदास ब्रह्मचारी ॥ श्रीरामसेवा बाह्यां-
तरीं ॥ जनता आत्मारामाभ्यंतरीं ॥ रंगले जे
॥ ३० ॥ धर्मनाशक अत्याचार ॥ प्रजापीडन

गोसंहार ॥ कुलस्त्रिया संतां अनिवार ॥ पीडा जी जी होतसे ॥ ३१ ॥ समर्थ ब्रह्मचारी जोगडे ॥ दऱ्यापर्वतीं वसती रोकडे ॥ त्या स्वरूपें ओळखितां जे सांगडे ॥ तेच वसती तयापाशीं ॥ ३२ ॥ महाराष्ट्रावरील संकट ॥ कोण टाळी ऐसा सुभट ॥ पाहती सर्वत्र समर्थ दूत ॥ कार्यकारी पुरुषार्थी ॥३३॥ जैसे चाळिणी माजी चाळितां दाणे ॥ बदला कचरा पहूं देणें ॥ हुरमुजी नेटका पाहोनि घेणें ॥ तेवीं शोधिती सर्वत्र ॥ ३४ ॥ शोधकां शोधितां गारगोटा ॥ परीक्षागुणें पाहतांच खोटा ॥ संस्कारितां होय सुघटा ॥ हिरा निपजेल खात्रीनें ॥ ३५ ॥ तोंचि भोंसले राजे शिवाजी ॥ समर्थें ओळखिला तो गाजी ॥ जोशापरी भविष्य अंतरामाजी ॥ आणोनि दृष्टी ठेविली ॥ ३६ ॥ बजरंग

ग्रं.क्रमांक ६५४९

मारुतीची भक्ती ॥ जनचित्तीं बिंबविती ॥
आखाडयाची सर्वत्र पद्धति ॥ शारीरिक
बळ वाढाया ॥ ३७ ॥ ऐशापरी जनीं
प्रसृति ॥ सद्‌गुरु समर्थांची महती ॥ लोकीं
लौकिक वाढविला अती ॥ सांप्रदाय
प्रसरला ॥ ३८ ॥ महासंत तुकाराम ॥
विठ्ठल ब्रह्ममुखीं नाम ॥ हरिकीर्तनीं तल्लीन ॥
अभंगवाणी वीतरागी ॥ ३९ ॥ कीर्ति
प्रसरली चोहींकडे ॥ शिवरायमना केलें
वेडें ॥ राजकारणीं मन उडे ॥ तुकारामीं
रंगलें ॥ ४० ॥ भेट घेती अती तांतडी ॥
उपजली विठ्ठलरूपीं गोडी ॥ देहकर्मा
विसर पाडी ॥ एकांत ईश्वर प्रार्थीचा
॥ ४१ ॥ पाहूनियां वरीची उपरती ॥ सेवक
जनें कळविली स्थिती ॥ राजे बहकले
ना ओळखिती ॥ चलावें आपण त्यांपाशीं

॥ ४२ ॥ ऐकोनि शिष्यांची वार्ता ॥
माता सुनेलागीं सांगे आतां ॥ जावोनि
आणीं तुझा भर्ता ॥ गोष्टी चार सांगोनि
॥ ४३ ॥ सईबाई गेल्या राजा पाशीं ॥ एकांत
वृत्ति तल्लीन मनाशीं ॥ ध्यास लागला
परमात्मवृत्तीशीं ॥ विस्मृति पडे सर्वांशीं
॥ ४४ ॥ पाहोनि ऐशा परीशी ॥ बाई सां-
गति तुकयापाशीं ॥ ऐकोनि खूणगांठ
पटली मनाशीं ॥ भेट घेति राजाची ॥ ४५ ॥
तुकारामें केला उपदेश ॥ आल्या अवतारींचा
कार्योद्देश ॥ पार पाडणें या तत्वास ॥ ओळखू-
नी वर्तावें ॥ ४६ ॥ तुम्हायोग्य ऐसा सद्गुरु ॥
श्रीसमर्थ असती साचारू ॥ मार्ग दर्शक
निश्चित थोरू ॥ अधिकारी योग्य ते ॥ ४७ ॥
ऐकोनि स्पष्ट अशी अभंगवाणी ॥ शिवराया-
च्या पटली अंतःकरणीं ॥ प्रेम लागलें

तुकयाचरणीं ॥ आज्ञा आपली शिरसामान्य ॥ ४८ ॥ राजे आनंदें आले घरा ॥ पाहते झाले कार्य पसारा ॥ समर्थ-चरणीं हेतु सारा ॥ वाहती मनीं रात्रंदिन ॥ ४९ ॥ श्रीसमर्थ भेटीची तंद्री ॥ उपजली ती सुचों नेदी ॥ हें मस्तक त्या चरणारविंदीं ॥ कधीं ठेविन जाहलें ऐसें ॥ ५० ॥ शोधितां महाप्रयासें अकस्मात ॥ गिरिगव्हरीं झाली भेट ॥ परी पाहोनि ध्यानस्थ ॥ केलें नमन साष्टांगें ॥ ५१ ॥ जयीं अभंग वाणी पडेल कानीं ॥ तयीं मस्तक उचलीन निर्वाणीं ॥ सद्रूप आणोनि ध्यानीं ॥ एकाग्रवृत्तीं दंडवत ॥ ५२ ॥ शब्दोचार पडले कानीं ॥ ध्येयकर्तव्या परीस झणीं ॥ कर्म करोनि दावा पहिल्यानीं ॥ आम्ही दूर नसोंचि ॥ ५३ ॥ यापरी स्पष्ट बोल पडतां कानीं ॥ सद्गुरु आज्ञा ह्मणूनी ॥

पाहति दशदिशा निरखोनी ॥ समर्थ मूर्ति
दिसेना ॥ ५४ ॥ मनाशीं बांधिली दृढगांठ ॥
कर्तव्याविना न होय भेट ॥ गुरुनाम उच्चा-
रुनि दुर्घट ॥ कार्य करूनि दाखवावें ॥ ५५ ॥
ऐशियापरी कर्तव्य कार्य ॥ उद्युक्त केलें तें
प्रसिद्ध होय ॥ संतलीळा न ओळखाय ॥
अंतरीं पटे तोंवरी ॥ ५६ ॥ तुकाराम निःसंग
ठेला ॥ विठ्ठलरूपीं पूर्ण भरला ॥ सर्वस्वी
वीतरागलेला ॥ भक्तिमार्ग दाऊनियां ॥ ५७ ॥
जनता रामीं रंगले ॥ जन माझे जनतेंत मुरले ॥
कार्यकारण दाऊनि आगळें ॥ समर्थ सदा
निरंजन ॥ ५८ ॥ जाणत्या जनें हें जाणलें ॥
अंशात्मक हे अवतरले ॥ कार्यकारण हातीं
धरलें ॥ हनुमंतरूप समर्थ ॥ ५९ ॥ शिवाजी
राजे कार्यकर्ते ॥ समर्थ सद्गुरु करविते ॥
कार्यकारणा जाणते ॥ लोकीं धर्म राखावया

॥ ६० ॥ श्रीशिवबापाशीं कार्यकरते ॥ पुरुष अनेक रत्नापरते ॥ चिटणीस देशपांड्यादिक ते ॥ समर्थपदीं तल्लीन ॥६१॥ इच्छा दिसली समर्थांची ॥ आज्ञा ह्मणोनि शिवबा झेलिती॥ कारभारी मस्तकीं धरिती ॥ पार पाडिती तांतडीनें ॥ ६२ ॥ ऐसियापरी समर्थभक्ति ॥ प्रभुचांद्रसेनीय कायस्थीं ॥ समर्थ सांप्रदाय स्वीकारिती ॥ आजवरी स्त्रीपुरुष ॥ ६३ ॥ स्वामीसेवापरायण ॥ रामसेवक हनुमंत गुण ॥ ते परी प्रसिद्ध पूर्ण ॥ प्रभु कायस्थ आचरिती ॥ ६४ ॥ समर्थ चरणींचें जाणोनि प्रेम ॥ भाव भक्ति पूर्ण ओळखून ॥ अवतरले ही निश्चित खूण ॥ श्रीराम मारुती चरित्रांतीं ॥ ६५ ॥ देशपांडे घराणें गांव पेण ॥ कुलवंत सदाचारी पूर्ण॥राजकार्जी मिळे वेतन ॥ पेशा सर्वदा नोकरीचा ॥ ६६ ॥ चांद्रसेनीय क्षत्रिय

वीर ॥ महाराष्ट्रीं वसले पूर्वापार ॥ हे है
कुलोत्पन्न साचार ॥ परी भूपत्व नाहीं यां
लागीं ॥ ६७ ॥ जैसें ययातीनें पुत्रां शापिलें ॥
एक पुत्रवंशें राज्य केलें ॥ बाकी परा अंकित
राहिले ॥ तेवीं स्थिति कायस्थांची ॥ ६८ ॥
क्षात्रकर्मीं रणधीर वीर ॥ धाडसादि गुणें
पूर्ण खंबीर ॥ मुत्सद्दी धीवान् अपार ॥
म्हणुनी वाटे मनीं शंका ॥ ६९ ॥ सेवाधर्म
अति उत्तम ॥ पूर्ण स्वामिसेवा परायण ॥
निष्कलंक स्वामिभक्त पूर्ण ॥ उज्वल इतिहास
आजवरिचा ॥ ७० ॥ पाहोनि ऐशा सत्कुलीं ॥
माता सीताबाई माउली ॥ वडील राजा-
रामभाऊ भली ॥ सेवा करिती ॥ ७१ ॥
मातुलग्राम भिवंडी कुळकर्णी ॥ माता धार्मिक
वृत्तीची खाणी ॥ सांप्रदायभक्ति रामचरणीं॥
त्या कुक्षीं जन्मले ॥ ७२ ॥ यापरी श्रीराम-

मारुती चरित्रामृत ॥ प्रस्तावरूपें प्रथमो-
ध्याय पूरित ॥ पुढें बाळपण लीलावृत्त ॥
चरित्रामृतीं येईल ॥ ७३ ॥ इतिश्री राम-
मारुती चरित्रामृत कथा ॥ प्रथमोध्यायीं
वर्णिली सर्वथा ॥ श्रीचरणीं अर्पूनि तत्वतां ॥
हरि कवि मनीं आनंदे ॥ ७४ ॥ ॥ ॥



## अध्याय २ रा.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्री सद्गुरुभ्योनमः ॥ श्रीराममारुतीचरित्रामृत॥ द्वितीयोध्यायीं बाललीला वर्णित ॥ जे निजानंदीं तल्लीन असत ॥ जन्मापासुनी॥१॥ सीताबाई माउलीतें ॥ झालीं चार अपत्यें ॥ दोन कन्या पुत्र दोन ते ॥ वामन शंकर नामें पैं ॥ २ ॥ शंकर अर्थे कल्याणकर ॥ लोकमुखीं कल्याण भिवंडीकर ॥ जन्मापासून वीतरागी परिकर ॥ प्रसिद्धीतें आले पैं ॥ ३ ॥ महाप्रयासें शोधितां परिकर ॥ शोधकां सिद्धार्थी संवत्सर ॥ सत्राशें एक्यायशीं सोमवार ॥ नवमी मुळीं जन्म जाहला ॥ ४ ॥ सर्वां अशुभ योग वाटला ॥ चिंता चित्तासी व्याकुला ॥ आनंदाचा विरस झाला ॥ परी

सत्य कोण जाणे ॥ ५ ॥ कुयोग अथवा अमृत
सिद्धियोग ॥ ज्यांचा भव हाचि जग ॥ स्थळ
काळाचा ज्यांसी अभाव ॥ त्यांसी दोन्ही
सारखे ॥ ६ ॥ जे नर देहीं दिसती डोळा ॥
परी सबाह्य अंतरीं वेगळा ॥ त्यासी ओळ-
खाया आगळा ॥ पूर्व वसे तोचि जाणे ॥ ७ ॥
जैसें रातान्न धान्य सूप भरून ॥ त्यामाजी
पांढरे तितुके वेंचून ॥ चोळितां तेजस्वी
सुवासिक पूर्ण ॥ उद्भवती त्यापरी ॥ ८ ॥
पापपुण्याचा समयोग होत ॥ तेधवां मनुष्य-
देह होत प्राप्त ॥ त्यांतून जाणता पंडित ॥
सुकृतें येत आवृत्तीनें ॥ ९ ॥ जन्मुनी राहिलें
कार्य अपुलें ॥ दृढ संकल्पें आचरतां उरें ॥
मृत्यु समयीं वासना उरे ॥ पुनरावृत्ती त्या
साठीं ॥ १० ॥ कित्येक विभूति ये रीती ॥ कार्य-
कारणापुरते येती ॥ पूर्तता करूनि जाती ॥

कैवल्यपदालागीं ते ॥ ११ ॥ झालेलें वासनेचें वाटोळें ॥ वासुदेवीं सबाह्य रंगले ॥ केवळ उपकारा अवतरले ॥ लोकांकारणें अलिप्त ॥ १२ ॥ नरदेह प्राप्त होतां ॥ जाणूनि त्याची श्रेष्ठता ॥ नारायणीं तल्लीनता ॥ त्याची थोरवी काय वर्णूं ॥ १३ ॥ ऐसे निजानंदीं रंगलेले ॥ नरदेह धरूनि लोकीं आले ॥ जन्मतां कुयोग लागलेले ॥ परी भवा सहित भस्म होती ॥ १४ ॥ जन्मल्या असल्या रत्नाची जाण ॥ मातापित्या होय कोठून ॥ केवळ पूर्वयोगीं आलें हें ज्ञान ॥ भविष्य केवीं कळावें ॥ १५ ॥ कांहीं मास गेलियावरी ॥ राजारामभाऊ आजारी ॥ झाले ओढवली व्याधी भारी ॥ भरली शंका नक्षत्राची ॥ १६ ॥ म्हणती देवें दिधला पुत्र ॥ परी जन्मकाळीं मूळ नक्षत्र ॥ जनकजननीचा घात मात्र ॥ खराखुरा होणार ॥ १७ ॥

शांति होम दान आदी ॥ कथिले जे जे धार्मिक विधी ॥ केले होते परी व्याधी ॥ वाढत चालली प्रतिदिन ॥१८॥ आप्तेष्टांमाजी भीति ॥ वाटूं लागली आतां निश्चिती ॥ राजारामभाऊ मृत्युपंथीं ॥ लागले हें साचार ॥ १९ ॥ इतुक्यामाजी चमत्कार ॥ झाला अकस्मात अनिवार ॥ राजारामाचे मातुल खारकर ॥ माधवनामें होते पैं ॥ २० ॥ होती संतपदीं त्यांची भक्ति ॥ बालमुकुंद स्वामीं-वरती ॥ बहू होती निश्चिती ॥ सद्‌गुरु मानिती त्यालागीं ॥ २१ ॥ सदां जाणें येणें त्यांचे मठीं ॥ नियमितपणें घेती भेटी ॥ प्रेमभक्ति स्वामी जाणती ॥ अंतरामाजी निश्चित ॥२२॥ बहुत दिवस झाले ॥ माधवराव नाहीं मठीं आले ॥ म्हणोनि तांतडीं निघाले ॥ शिष्य-गृहीं गुरू ते ॥ २३ ॥ पाहूनियां सद्‌गुरूंची

मूर्ति ॥ चिंता मानसीं जडली होती ॥ परी
दर्शनलाभ अकस्मातीं ॥ म्हणूनि आनंद जाह-
ला ॥ २४ ॥ कथिलें चिंतेचें कारण ॥ राजा-
राम भाऊतें घडविलें दर्शन ॥ शंकर बाळा
दर्शना नेऊन ॥ चरणीं माथा ठेविला ॥२५॥
स्वामी आपुलें दर्शन ॥ अवचित लाभलें हें
पूर्वपुण्य ॥ यापणी हें शेवटचें मजलागुन ॥
झालें ऐसें दिसतसे ॥ २६ ॥ ऐकोनि सीता-
बाईचें भाषण ॥ स्वामी बोलले तिजलागून ॥
व्याधी दुरावेल हें जाण ॥ आनंद होईल सर्व-
स्वी ॥ २७ ॥ शंकरबाळा स्वामीचरणीं ॥
मातेनें घातलें भक्तीनीं ॥ मूळनक्षत्रीं जन्म-
ला म्हणोनी ॥ न्हावा आपुला म्हणाल्या
॥ २८ ॥ स्वामी बोलले माउलीशीं ॥ चिंता
न करावी मानसीं ॥ हा आमुचा निश्चयेंसीं ॥
जाऊं घेवोनि वेळ येतां ॥ २९ ॥ ऐसें बोलोनि

कुर्वाळुनी ॥ बाळ दिधला माते लागुनी ॥
ठेव आमुची रक्षा ह्मणोनि ॥ आर्शीर्वाद
दीधला ॥ ३० ॥ संतदर्शन अकस्मात ॥ बा-
ळासह लाभलें निश्चित ॥ निर्वाणींचे बोल
मानित ॥ भक्तिभावें तेधवां ॥ ३१ ॥ भावना
फळासी आली ॥ व्याधी दूर होत चालली ॥
वैद्यांनीं असाध्य ह्मटलेली ॥ नवल वाटलें
इतरांतें ॥ ३२ ॥ शुक्लपक्षींच्या इंदूप्रमाणें ॥
बाळ वाढलें पूर्णपणें ॥ वाटला आनंद तेणें ॥
बाळ लीला पाहून ॥ ३३ ॥ गबाळ अल्लडप-
णा भारी ॥ एकलकोंडा स्वेच्छाचारी ॥ वाढलें
पात्र पाहतां भिकारी ॥ तृप्तपणें देत त्या॥३४॥
लत्ताकपडा अंगावरील ॥ उतरून देई शंकर
बाळ ॥ दया अंतरीं बहुसाल ॥ उपजतां गुण
दृष्टी पडे ॥ ३५ ॥ शाळा विद्येचा व्यासंग ॥
मनासी कंटाळा अभंग ॥ स्वइच्छ वर्तनाचा

योग ॥ दिवसमासीं वाढता ॥ ३६ ॥ सात आठ वर्षांचे असतां ॥ टाकळीचे सांप्रदायी तेवखतां ॥ भिवंडी मुक्कामीं सहज येतां ॥ गांठ पडे उभयतांची ॥ ३७ ॥ अंतरींची खूण पटली ॥ दृढ मैत्री दिसों लागली ॥ सान्निध्याची प्रीति जडली ॥ चमत्कार वाटला॥३८॥ देतां एका बाईस उपदेश ॥ शंकरबाळ येतां गुरूस ॥ द्यावी माळ या मुलास ॥ सांप्रदायी करावा ॥ ३९ ॥ ऐकोनि बाईचें भाषण ॥ गंगाधर महाराज हांसून ॥ बाळ शंकरासी घेऊन ॥ कानीं कांहीं सांगितलें ॥ ४० ॥ संबोधिलें रामजी नामें ॥ उनाडपण उडे तेणें ॥ संथपण एकांतीं राहणें ॥ पूर्व वृत्ती पालटली ॥ ४१ ॥ जैसी गारगोटी पारखूनी ॥ मारी टाकी चरक सहाणी ॥ संस्कारें अंतरींचे झणी ॥ दृष्टीस पडे तैसें झालें ॥ ४२ ॥ शाळा

शिक्षणीं श्रम केले ।। नाहीं मराठी मना आलें ॥
शिको गुजराथी पत्कारिलें ॥ म्हणूनि त्या
शाळे घातलें ॥ ४३ ॥ जमियत रामभाऊंचे
प्रिय मित्र ॥ तेही श्रमले अनेकपरि विचित्र ॥
ज्याचें पूर्वजन्मीं शिक्षण पवित्र ॥ झालें त्या-
सी काय देणें ॥ ४४ ॥ तो प्रकार दिसाया
उणें ॥ काल कारणाचीं संमेलनें ॥ होती
तेव्हां जनचित्त नयनें ॥ धांऊनियां लागती
॥ ४५ ॥ जैसी झाडाची मुकणी कळी ॥
गुणरूप दावावया निर्बळी ॥ कालें
उमलतां एकेक पांकळी ॥ घ्राणेंद्रिया
बोध तेव्हां ॥ ४६ ॥ संस्कार पहिला घडला॥
मनासी अती घोळ लागला ॥ सर्व परीचा
फरक झाला ॥ तंद्री जडे एकांताची ॥ ४७ ॥
जावें देवालयीं निघोन ॥ वसावें पोत्यांत
पाय घालोन ॥ किंवा पिंडीवर पडोन ॥

राहावें एकाग्र करोनी ॥ ४८ ॥ वस्त्राप्रावरणाची इच्छा ॥ नसे क्षुधा तृषेची वांछा ॥ हांक मारोनि देती त्याचा ॥ अव्हेर कधीं नसेची ॥ ॥ ४९ ॥ जीवन-यात्रेची नसे चिंता ॥ संतसमागमीं रंगे चित्ता ॥ वैराग्य बाणे ये परता ॥ व्याप नसे कांहींही ॥ ५० ॥ भीमेश्वर रामेश्वर अखंड ॥ श्रीराम हनुमंतीं दृढ ॥ बालाजींसह भक्ति-वेड ॥ लोकीं दिसूं लागलें ॥ ५१ ॥ पिंडी धरूनि पालथें पडतां ॥ लोकीं चमत्कार वाटे चित्ता ॥ जैसें मार्कंडेयाचें आयुष्य सरतां ॥ यमधर्म स्वतां येई ॥ ५२ ॥ शंकरमूर्ति प्रकट जाहली ॥ आयुरज्जू घट्ट केली ॥ भक्तवत्सल करी साउली ॥ पाश तोडिला यमाचा ॥ ५३ ॥ तैसी दिसे लोकीं कृती ॥ चमत्कार आहे ऐसें ह्मणती ॥ जणों षड्रिपूंच्या हातीं ॥ पडों नये म्हणोनी ॥५४॥

समंजसानीं ओळखलें ॥ हे प्रवृत्तीतें कंटा-
ळले ॥ भवार्णवा पूर्ण भ्याले ॥ संत धर्म
दिसतसे ॥ ५५ ॥ मी कोण आलों कोठून ॥
कार्य कारणाची मना जाण ॥ देई प्रवृत्तीला
लोटून ॥ त्यासी सर्व सारखें ॥ ५६ ॥ पर्वत
दऱ्या अरण्यें ॥ एकांतींच्या सर्व साधनें ॥
मन वारू जिंकिला जेणें ॥ शांतिच तया
सर्वत्र ॥ ५७ ॥ कूर्माकृति देवालयीं ॥ दर्शना
जातां यासी पायीं ॥ दिसे परी ओळख नाहीं ॥
कवण तत्वें असावा ॥ ५८ ॥ कूर्म-शरीरीं
स्पर्श होता ॥ तो बाह्येंद्रियें आंत घेतां ॥ या
तत्वां ओळखतां ॥ एकाग्रतेचें तत्व कळे
॥ ५९ ॥ अंतर इंद्रिया आकळोन ॥ सेवक-
भावा ओळखोन ॥ देव तत्वा जाणून ॥ एक
तंद्री या रूपीं ॥ ६० ॥ ऐसी उपासना रा-
मजी बाळें ॥ सर्व देवीं ऐक्य वसलें ॥ दुजे-

पणासी पारखें केलें ॥ सर्वभावीं एकत्वें ॥६१॥ गुहा अरण्यें ग्रामखेडें ॥ सर्वत्र भरला रोकडे ॥ उपाधीचें फेंकिलें आंगडें ॥ एकाग्रतत्वें एकरूप ॥ ६२ ॥ ऐशा वृत्तीचा बोलबाला ॥ बाळपणीं होऊं लागला ॥ धनवडकर-गृहीं वाद जुंपला ॥ पंडितीं वेदांताचा ॥ ६३ ॥ धनवडकरां स्मरण झालें ॥ रामजी बाळा आणविलें ॥ तत्ववादा ओळखलें ॥ पाटी द्या कीं खुणेनें ॥ ६४ ॥ लिहून दिधली पाटी हातीं ॥ धनवडकरें वाचूनि पुढती ॥ पंडितीं वाचूनियां ख्याती ॥ केली बहुत रामजींची ॥ ६५ ॥ धनवडकरें केली विनंती ॥ नित्य भोजना सांगातीं ॥ यावें ह्मणाले भाव चित्तीं ॥ तेव्हांपासून बैसला ॥ ६६ ॥ कधी दूध मिष्टान्न ॥ परी परी एक करून ॥ श्रीरामनामें ग्रास उचलोन ॥ एकाग्रत्वें जे-

विती ॥ ६७ ॥ भजन प्रेमीं चित्त जडे ॥ लाज भीड सफा उडे ॥ भजनरंग कोणीकडे ॥ असो तेथें त्वरें जाती ॥ ६८ ॥ नाचणें उडणें ताल धरणें ॥ मुखीं भुभुःकार करणें ॥ स्वरीं मिळुनी ताना घेणें ॥ नामघोषें तेधवां ॥६९॥ उत्सवांतीं पालखी पुढें ॥ नाचणें लोळण प्रेम वेडें ॥ भान विरहित तंद्री चढे ॥ उंच उड्डाणें पांच हात ॥ ७० ॥ वृत्ती ऐशी वाढूं लागली ॥ आप्त स्वकीयां खातरी पटली ॥ भवार्णवा आंचवलेली ॥ संतमूर्ति खास असे ॥ ७१ ॥ जे निजानंदीं रंगले ॥ आपपर भावा विसरले ॥ माझें तुझें कांहीं न उरलें ॥ तोहि सर्व जगाचा ॥ ७२ ॥ अंतरींची खूण जाणली ॥ त्यांसी पूर्णत्वें बांधिली ॥ त्यांचीं बाह्येंद्रियें कुलीं झालीं ॥ शीतोष्ण त्यांसी नहेना ॥ ७३ ॥ ऐसी स्थिति रामजींची ॥

स्थलें अनिश्चित बसण्याचीं ॥ दुःख आनंद समत्वेंची ॥ सर्व ऋतू सारखे ॥ ७४ ॥ या परी बाललीला कथा ॥ अद्वैत-वृत्ती वैराग्यपंथा ॥ दावी संत महिमा तत्वतां ॥ बाळपणापासूनी ॥ ७५ ॥ इति श्रीराममारुती चरित्रामृतीं ॥ बाललीला निवृत्तवृत्ती ॥ पुढें साधनमार्गा दाविती ॥ निजरीति लोकांतें ॥ ७६ ॥

## अध्याय ३ रा.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्री-
सद्गुरुमूर्तये नमः ॥ श्रीराममारुती चरित्रामृ-
तीं ॥ द्वितीयोध्यायीं वर्णिली बालवृत्ती ॥
तृतीयोध्यायीं साधनगती ॥ प्राप्तली ते कथिलें
जें ॥ १ ॥ पूर्वसंचितें प्रेम जडे ॥ देवाडायीं
दिसती वेडे ॥ भजनरंगीं रंग चढे ॥ देहभा-
ना विसरती ॥ २ ॥ पूर्ववृत्तीचा पालट होत
॥ मुग्धवृत्ती हळुहळू सुटत ॥ जड चैतन्याचें
कोडें पडत ॥ उकलेना ह्मणोनी ॥ ३ ॥ मी
कोण आलों कोठून ॥ काय कर्तव्याचा पुढें
प्रश्न ॥ मनासी न पडे चैन ॥ कोडें न सुटे
अंतरींचें ॥ ४ ॥ जडली नामस्मरणाची आ-
सक्ती ॥ अहोरात्र जप होती ॥ गाढ निद्रेंत
ऐकूं येती ॥ श्रीरामनाम उच्छ्वासीं ॥ ५ ॥

वेग भरला तयीं ॥ १७ ॥ वसती कोठें राहती कसे ॥ अन्नोदक घेतलें वा नसे ॥ निद्रा जागृती पुसणें नसे ॥ वीतराग वृत्ति प्रसिद्ध ॥ १८ ॥ ऐशा वृत्तीस शोधी कोण ॥ बढता रंग दिनानुदिन ॥ कोण कैंचें समाधान ॥ येवोनि करी अवचित ॥ १९ ॥ ध्येय ताप मना, चेतवी ॥ दृढरूप दुग्धा येत उकळी ॥ उभ्यापरी अश्रुजळीं ॥ धरित्रीला भिजविती ॥२०॥ वाटे धरित्रीस ह्मणती॥ भार जाहलों या जगतीं ॥ मजसमान या पुढती ॥ ना प्रसवीं गे माये ॥२१॥ क्षुधा तृषेनें आर्तलों ॥ वणवण करितां हिंडलों ॥ मृगजलापरी फसलों ॥ जल ना तया अमृत कैचें ॥ २२ ॥ ऐशापरी चाललें असतां ॥ तो योग आला अवचिता ॥ माधवराव मुंबईस जातां ॥ भगिनीसुत आले सन्मुख ॥२३॥पुसती पितृमातुला जातां कोठें ? ॥ येऊं

काय मी सांगातें ? ॥ नवल वाटलें माधवा-
तें ॥ पुसती येतो का मुंबापुरीं ? ॥ २४ ॥
आजची रात्र सद्गुरु मठांत ॥ काढणें आहे
सान्निध्यांत ॥ पूजा अर्चा भजनांत ॥ परवडे
तरी येईंगा ॥ २५ ॥ इच्छा होती तेंच आलें ॥
सहजपणें पुढें ठेलें ॥ चित्तीं अत्यंत आनं-
दले ॥ निघालेचि झडकरी ॥ २६ ॥ शुद्ध
दृढ ध्येयाचें फळ ॥ हेंचि योग तपोबळ ॥
करी ईश्वरा उतावीळ ॥ इच्छा तृप्ती होतसे ॥
॥ २७ ॥ दृढ भाव ज्याचा झाला ॥ भावना
रूपें एकवटला ॥ त्याला देव आगळा ॥
राहेचिना ॥ २८ ॥ यापरी सफल झाली
भावना ॥ शींवाहुनी गेले सद्गुरुदर्शना ॥
ती आनंदमूर्ति दिसली नयना ॥ केले साष्टांग
प्रणिपात ॥ २९ ॥ तूंचि माझा ज्ञानदाता ॥
तूंचि तिमिरा घालविता ॥ धन्य धन्य कृपा-

वंता ॥ सद्गुरुनाथा भेटलासी ॥ ३० ॥ ऐसें ह्मणोनि अंतःकरणीं ॥ आनंदें हृदयीं गद्गदोनी ॥ दंडापरी पडले धरणी ॥ सद्गुरुचरणीं रामजी ॥३१॥ स्वामींनीं पुसला वृत्तांत ॥ कोण कोठील काय हेत ॥ ऐकोनि तोषले चित्तांत ॥ पटली ओळख हृदयासी ॥ ३२ ॥ मार्ग झाला मोकळा ॥ दूर झाला अडथळा ॥ इच्छामात्रें पडे पाउला ॥ शिवाहुनी सुबद्दतें ॥ ३३ ॥ जा ये झाली सदा चालू ॥ सद्गुरुचरणीं श्रद्धाळू ॥ विनत पाहूनि कनवाळू ॥ सद्गुरु हृदयीं आनंदले ॥ ३४ ॥ श्रीसद्गुरुस्वामी बाल-मुकुंद॥ब्रह्मचारी तेजस्वी अगाध ॥ वृत्तींत पूर्ण आनंद॥अभेदत्वें सर्वांशीं ॥ ३५ ॥ मुंबापुरींत मुक्काम ॥ कांदेवाडी प्रसिद्ध पूर्ण ॥ बनलें भक्तींचें स्थान ॥ मठ पवित्र अश्वत्थतळीं ॥ ३६ ॥ निजामहैद्राबाद

विख्यात ॥ श्रीगुंडो महाराज तेथील होत ॥ ज्यांनीं ब्रह्म जाणिलें साक्षात ॥ त्यांचे शिष्य स्वामी पैं ॥३७॥ श्रीगुंडोजींचे शिष्य अनेक॥ श्री नारायण, सखा, आणिक ॥ ज्ञान, नाथ, आदि अष्टक ॥ त्यांतील स्वामी एक पैं ॥३८॥ कांती स्वामींची गोमटी सुंदर ॥ स्थूल कृश ना उंच शरीर ॥ धिप्पाड छाती चर्या गंभीर ॥ मधुर वाणी आनंदी ॥ ३९ ॥ भजन प्रेमी सदा अढळ ॥ पायीं बांधोनि नाचती चाळ ॥ वाटे तारुण्य उद्भवलें सकळ ॥ भजन रंगीं पाहतां ॥ ४० ॥ वैराग्य मूर्ति योगी जनीं ॥ नित्यनेम पार्थिव अर्चनीं ॥ स्वामीमुखीं प्रसादवाणी ॥ भाविकजन येती सदा ॥४१॥ अनेक तीर्थें महायात्रा ॥ पादचारी केल्या त्या पवित्रा ॥ संतसमागम पुण्यक्षेत्रा ॥ पर्वत गुहा धुंडिल्या ॥ ४२ ॥ देशा गुरूशीं शिष्य

लाभले ॥ अद्‌भुत प्रेम ओथंबलें ॥ शिवाचें वास्तव्य सोडिलें ॥ सद्‌गुरुचरणीं राहती ॥ ४३ ॥ गुरुसेवा देवसेवा ॥ भजनामृत नित्य प्यावा ॥ तोचि पेला सदा व्हावा ॥ बालपणापासूनी ॥ ४४ ॥ पाहूनि उत्तम भक्तीला ॥ अंतरीं सद्‌गुरु आनंदला ॥ उपनयना पात्र झाला ॥ उपदेशा योग्यचि ॥ ४५ ॥ उपनयनाचें पांघरतां घोंगडें ॥ अज्ञानें उलट शीत चढे ॥ ज्ञान डोळा जयीं उघडे ॥ तेंचि खरें उपनयन ॥ ४६ ॥ गळां घातला सुताचा दोरा ॥ लंगोटी नेसविली परिकरा ॥ प्रथमाश्रमाची जाणीव जरा ॥ नापडे तें उपनयन का ? ॥ ४७ ॥ असो सुमुहूर्त मौंजीचा ॥ गुरूनें अंकीं बैसवोनि साचा ॥ झाला संस्कार थाटाचा ॥ श्री स्वामीच्या मठांत ॥ ४८ ॥ झाला उपदेश नित्य नेम ॥ ध्यान

धारणा प्राणायाम ।। योग विद्या आक्रमण ॥
गुरुसमीप चालतसे।४९।योग मार्गाची प्रगती॥
सच्छिष्यें मेळविली किती॥ परीक्षेनें दाविली
प्रचीति ॥ भजनरंगीं सर्वजनां ॥ ५० ॥
एक स्वामीशिष्य काशीस गेला ॥ पाय
घसरोनी गंगेंत पडला ॥ अंतर्ज्ञानें जो वर्तला
॥ वृत्तांत जाणिला स्वामींनीं ॥ ५१ ॥ शि-
ष्याकडे गुरूनें पाहिलें ॥ अंतरींचें झणीं
जाणिलें ।। समाधीतें चढविलें ।। जड ठेविलें
तेथेंचि ।। ५२ ॥ आत्मबलें काशीस जाऊनी॥
गुरुबंधूस उठवोनी ॥ मागुती जडांत शि-
रोनी ॥ यौगिकबळें केलें कीं ॥ ५३ ॥ अंतर
ज्ञानें गुरूस कळलें ॥ शिष्यास हर्षानें
आज्ञापिलें ॥ शिरसा वंद्य ह्मणूनि झेलिलें ॥
काम केलें झडकरी ॥ ५४ ॥ योग्यांची क्रिया
योगी जाणती ॥ इतरांस त्या सत्याची पडे

भ्राती ॥ ज्या पूर्व संचितें समागम होती ॥ तेच जाणती सत्यता ॥ ५५ ॥ यापरी होतां पूर्ण तयारी ॥ सद्गुरुसंगें यात्रा भारी ॥ अनेक तीर्थें पादचारी ॥ हिमालयासहित ॥ ५६ ॥ अगम्य गुहा संत महंतीं ॥ वसल्या तेथें योगमार्गें जाती ॥ परस्परांच्या भेटी होती ॥ तो आनंद काय वर्णूं ॥ ५७ ॥ सद्गुरुसमागम आनंद सागर ॥ त्यांत संत महंत तीर्थें अपार ॥ त्या संगमाचा आनंद बहर ॥ ज्याशीं होई त्या ठावा ॥ ५८ ॥ जैसी पक्क आम्रफलाची गोडी ॥ रसना चाखी अती आवडी ॥ दंतादिक हुकमी गडी ॥ चोखण्या मार्ग करिती पैं ॥ ५९ ॥ किंवा ब्रह्मरसाचा घुटका ॥ अज्ञाना वितंड वाटे नीका ॥ ज्ञात्या लागे आनंद झटका ॥ डोलूं लागे अंतरीं ॥ ६० ॥ किंवा शुद्ध राग तालसुरीं ॥ गायक गायी

शास्त्रापरी ॥ मूढा तानस्वराची वैखरी ॥ ऐकोनि वदे वात झाला ॥ ६१ ॥ तो तादात्म्यानंद वेगळा ॥ ज्यापाशीं संचिताचा ठेला ॥ त्यांनाच प्राप्त तो भला ॥ इतरां कोठोनि असणार ॥ ६२ ॥ कायावृक्षीं पक्षी दोन ॥ एक फळें भक्षी परी तृप्ती न ॥ दुसरा तृप्तपणें पाहे पूर्ण ॥ सहजपणें चहूंकडे ॥ ६३ ॥ अतृप्त पक्षी त्या पक्षासीं ॥ पाहे कोण कैसा तें मानसीं ॥ विवेकें शोधितां त्याशीं ॥ मैत्री झाली अभेद ॥ ६४ ॥ जीवशिवाची ओळख पटली ॥ तादात्म्यपणें ऐक्यता झाली ॥ मी तूं पणाची दुही फिटली ॥ त्या मोक्ष कैंचा आगळा ॥ ६५ ॥ ज्या झालें पिंडब्रह्मांडाचें ज्ञान ॥ त्याच्या वृत्ती स्थिरावल्या पूर्ण ॥ त्यासी न्यूनता न दिसे संपूर्ण ॥ सदानंदीं पूर्णता ॥ ६६ ॥ शके अष्टोत्तर शत पंचमात ॥ शुक्र-

पक्ष पौष मासात ॥ गुरुशिष्य आले मुंबईंत ॥ आनंद झाला सर्वांसी ॥ ६७ ॥ पुढती थोडे दिवस राहोनि ॥ स्वामी हरिपुरासीं जाती तांतडीनीं ॥ सर्वे पंधरा शिष्य घेवोनि ॥ मुख्य रामजी सहीत ॥ ६८ ॥ तेथें गेल्यावर प्रकृतीस ॥ ज्वरोपद्रव झाला विशेष ॥ रात्रौ पौष वद्य नवमीस ॥ शिष्योत्तमा सांगितलें ॥ ६९ ॥ उदयीक दशमी तिथीस ॥ आम्हां जाणें विष्णुलोकास ॥ अंतरीं दुःख क्लेशाचा वास ॥ होऊं न देणें विवेकें ॥ ७० ॥ यात्रा येथली संपली ॥ तुमची तुम्ही सांभाळावी भली ॥ जी कार्यकारणाभावें लाभली ॥ ती पूर्ण होवो संपूर्ण ॥ ७१ ॥ झाला आरंभ भजनानंदास ॥ रामजी बैसले गीतापाठास ॥ सूर्योदयाच्या समयास ॥ कैवल्यधाम गांठिला ॥ ७२ ॥ सहवास प्रेमें उद्विग्नता ॥

झोंबली सर्वांचिया चित्ता ॥ भंडारा प्रसाद देऊनि समस्तां ॥ रामजी गेले तीर्थाटना ॥ ७३ ॥ श्रीराममारुतीशीं साधनमार्ग ॥ दाऊनि पुरविला कार्यभाग ॥ पुढले अध्यायीं लीला योग ॥ दाविला तो लिहिला असे ॥ ७४ ॥ इति श्री राममारुती चरित्रामृतीं ॥ तृतीयोध्यायाची समाप्ती ॥ पुढले अध्यायीं सावधान चित्तीं ॥ चरित्र ध्यानीं बसवावें ॥ ७५ ॥ इति राममारुती चरित्रामृत तृतीयोध्यायः ॥ ॥ ॥ ॥

## अध्याय ४ था.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीसद्गुरुचरणारविंदायनमः॥श्रीराममारुती चरित्रामृतीं ॥ तृतीयोध्यायीं साधनगती ॥ चतुर्थोध्यायीं लीला वृत्ती ॥ केली ते वर्णित ॥ १ ॥ दशरथ सुत रामचंद्राशीं ॥ विश्वामित्र आले मागावयासी ॥ पुत्रमोहें ना ह्मणे त्यासीं ॥ मग भूपा बोधिलें वसिष्ठें ॥ २ ॥ रामभद्रा तूं न जाणसी ॥ पूर्व सुकृतें लाभलासी ॥ अपत्य मोहीं पडलासी ॥ त्याचें कार्य दुजें असे ॥ ३ ॥ दुष्ट दुर्मदांचा भूभार ॥ झाला असे अनिवार ॥ देवादिकां बेजार ॥ रावणादि करितात ॥ ४ ॥ तरी विश्वामित्र ब्रह्मवेत्ता ॥ त्यासारखा नसे परता ॥ सर्व सिद्धींना राबविता ॥ दुजा विधाता असे

कीं ॥ ५ ॥ रामचंद्र तुजला बाळ ॥ परी दुष्टा होईल काळ ॥ कीर्ति सरोवरींचा मराळ ॥ अमरत्वें होईल पैं ॥ ६ ॥ तरी परा अपरादि विद्या कला ॥ प्राप्त होतील बाळा सकळा ॥ अस्त्रादि विद्या जी उज्वला ॥ ज्ञात होईल त्यालागीं ॥ ७ ॥ तरी सोडीं या मोहासी ॥ रामभद्रा देईं त्यासी ॥ हेंचि ब्रह्मवेत्ता मनासीं ॥ कार्य कारणा न जाणसी ॥ ८ ॥ यापरी वसिष्ठें केला उपदेश॥रामलक्ष्मण दीधले गाधिजास॥ सिद्धाश्रमीं नेऊन त्यांस ॥ संस्कारिलें पूर्णत्वें॥ ९ ॥ महर्षीचें यज्ञकाज ॥ पार पाडिलें तदा सहज ॥ जनकागृहीं नेले अनुज ॥ चापभंग कराविला ॥ १० ॥ यापरी कार्यकारणाची स्फूर्ती ॥ संस्कारें उद्भविली ती ख्याती ॥ वाल्मिकींनें जाणूनि निश्चिती ॥ वर्णिली ती विख्यात ॥ ११ ॥ यापरी राम-

जीतें संस्कार घडला ॥ कार्यकारणाचा भाव कळला ॥ भाषेचा सर्वस्वी त्याग केला ॥ ईश नामें बोलती ते ॥ १२ ॥ एक तप यात्रा संपूर्ण ॥ स्वइच्छपणें सर्व करून ॥ जयीं आले परतोन ॥ तयीं वृत्ती निराळी ॥ १३ ॥ स्वच्छ भाषा बावीस नामांची ॥ प्रसंग विशेषीं बोलती साची ॥ 'जयराम' नामें प्रश्नसूची ॥ 'श्रीराम' जाणिजे मनोल्हाद ॥ १४ ॥ 'जय जयराम' स्त्रीलिंग देख ॥ रामचंद्र ईशवाचक ॥ 'रघुवीर' दुःख दर्शक ॥ 'जयजय रघुवीर' नको चिंता ॥ १५ ॥ 'भीमाशंकर' वेडा कर्महीन ॥ लठ्ठ दांडगा उनाडपूर्ण ॥ जय प्रत्ययें अत्यंतिक विशेषण ॥ 'विठ्ठल' नामें होकार ॥ १६ ॥ विठ्ठल, विठोबा, संबोधन ॥ 'शिव शिव' नामें त्याज्य दूरीकरण ॥ 'हर हर महादेव' भय दर्शन ॥ गोविंद, गोपाळ

हरदु पैं ॥ १७ ॥ 'गोविंद' एक 'गोपाळ'
दोन ॥ 'गोपाळकृष्ण' असे जें सान ॥
'गणपती' नामें भव्यता पूर्ण ॥ 'दत्तात्रेय'
दरिद्रता ॥ १८ ॥ 'बलभीम' कसरती पीळ-
दार ॥ किंवा भोजन शब्दोच्चार ॥ 'मारुती'
जाण शनिवार ॥ किंवा लाडू बट्टु पैसा ॥१९॥
'पांडुरंग हरि रामचंद्र' नाम ॥ हरि नारायण
ईशवाचक पूर्ण ॥ तैसेचि वार नामाची जाण
॥ मोदकारी वाटते ॥ २० ॥ सोमवार 'शिव
शंकर' नाम ॥ मंगळ 'जयजयराम' पूर्ण ॥
विठोबा वार सौम्य ॥ गुरुवार जाणिजे ॥२१॥
भृगु 'शिवशिव जयराम' होय ॥ मंद
मारुती प्रमेय ॥ रविवार नारायणाय ॥ ऐसीं
नांवें ठेविलीं ॥ २२ ॥ यापरी मौनवृत्ति प्रासं-
गिक वाणी ॥ सहवासें येई ध्यानीं ॥ विद्या-
र्थ्यांसी समजे झणी ॥ गूढ गणितें समजा-

विती ॥ २३ ॥ भिवंडी ग्रामीं ख्याती पूर्ण ॥
बाळकांसी आनंद घन ॥ गूढ प्रश्ना झालें
स्थान ॥ सदानंदी निर्लोभी ॥ २४ ॥ अनुभव
लोकां पडूं लागला ॥ भक्तिभाव वृद्धि पा
वला ॥ दर्शनाचा अमृत मेला ॥ राममारुती
महाराज ॥ २५ ॥ आधींच श्री राम हनुमंत
भक्ति ॥ भुभुःकार लीला भजन वृत्ति ॥ ते-
सींच ब्रह्मचर्या शरीराकृती ॥ हनुमंत
अंशात्मक ॥२६॥ महाराज नामें संबोधिती ॥
शरीरयष्टी उंच गोरटी ॥ सुवर्णापरी तेज-
कांती ॥ छाती बरवी रुंद असे॥२७॥पायांकडे
कमजोर ॥ बाळपणीं ह्मणती पांगुळा होणार ॥
जनवाणी सदा अनिवार ॥ सदा शंकित
भरलेली ॥ २८ ॥ जगती जन्मती जीं
माणसें ॥ त्या दरेकाचें भविष्य कसें ॥ आयु-
र्गुणें रोकडें असे ॥ ज्योतिर्विदां कळेना ॥२९॥

यापरी ईशनामाची अस्खलित वाणी ॥ लोकांकारणें निर्मियली याणी ॥ संत महात्म्यांची आज्ञा ह्मणोनी ॥ सांप्रदाय चालवणें ॥ ३० ॥ तरी शिष्यवृंदांचा पसारा ॥ किंवा गुरुमंत्र महिम्याशीं थारा ॥ तनुमनधनातें अर्पण करा ॥ ऐसी दांभिकता नसे तयीं ॥ ३१ ॥ केवळ नामस्मरणाचा महिमा ॥ भक्तिरसात्मक भजन कर्मा ॥ वैराग्यशाली आनंदपूर्णा ॥ रामभक्ति मुख्यत्वें ॥ ३२ ॥ कोणी येऊ कोणत्याही मिषें ॥ सहजपणें आनंद वेषें ॥ खूण गाठ सोडवोनि विशेषें ॥ गार अंतरीं बहु होती ॥ ३३ ॥ येती कित्येक परीक्षा पहाया ॥ कुत्सितपणें दर्शना घ्याया ॥ त्या अंतरींचें किल्मिष जाया ॥ विलंब न होई जराही ॥ ३४ ॥ कित्येकांना वाणीचें ढोंग ॥ गाढ निद्रेंत असतां सांग ॥ पाणी टाकुनि

भिजविलें अंग॥परी मुखीं रामा रघुपते॥३५॥
भजनीं नाचतां वरतुन निखारे॥टाकिले त्याचे
कोळसे सारे ॥ चिंता भयाचें ज्यातें वारें ॥
शिवेना तें कधींही ॥३६॥ ज्यांनीं चिंताभयातें
गिळिलें ॥ अहिंसा तत्व आकळिलें ॥ राग
द्वेषादि बद्ध केले ॥ गोव्याघ्र नांदती त्यापाशीं
॥३७॥ शीतोष्ण बाधा तयालागीं ॥ वन्हिजल
समत्वें आंगीं ॥ देह सौख्यातें जे वीतरागी ॥
त्यांसी सर्व सारखें ॥ ३८ ॥ मागणें नाहीं
कोणापाशीं ॥ माझें ह्मणोनि रक्षायासी ॥
देह राजभोगी भोजनाशीं ॥ कदान्न पात्रीं
नये कधीं ॥ ३९ ॥ वेष दिसे गृहस्थाचा ॥
माथीं पटका जरि कांठीचा ॥ उपवस्त्र
कांठ जरीचा ॥ साधें शुभ्र धोतर ॥ ४० ॥
घट्ट कांस घालोनि नेसती ॥ जेंवि
ब्रह्मचर्याची लंगोटपद्धति ॥ भोजन प्रसंगीं

सांवळें घेती ॥ परंपरेचा आचार ॥ ४१ ॥
चांद्रसेनीय किंवा ब्राह्मण ॥ याकडे घेती
अन्न ॥ इतरीं पेढावर्फी वांचोन ॥ खाणें नाहीं
कधींही ॥ ४२ ॥ आंग्ल वैद्य मराठे इत्युप-
नाम ॥ त्यांकडे संध्या प्राणायाम ॥ धनवड-
कर गृहीं भोजन ॥ भिवंडी एथें चालतसे
॥ ४३ ॥ शिक्षण ऐसें घेतलें नसे ॥ परी
गीर्वाणज्ञान सांग असे ॥ शुद्ध षड्जस्वरीं
गान असे ॥ नामस्मरण भजन तें ॥ ४४ ॥
वेदांत शास्त्रीं निष्णात ॥ इतर विषयीं पारं-
गत ॥ विद्वज्जनासीं वाद होत ॥ लेखनानें
झडकरी ॥ ४५ ॥ मिटक्या मारीत तांतडीनें
॥ मुखाकृती मारुती प्रमाणें ॥ खातां मिच
मिच शब्द होणें ॥ करांगुलि लवचिक वान-
राकृति ॥ ४६ ॥ तेधवां सर्वां होई भास ॥
हनुमंताचे अंशात्मक खास ॥ रामनाम अं-

तरी ध्यास ॥ ब्रह्मचारी भुभुःकारें ॥ ४७ ॥
जनीं लौकिकाचा कंटाळा ॥ स्तुति न व्हावी
तिला आळा ॥ सर्वांशीं मितपणाचा गोळा
॥ वर्तन पाहतां दिसतसे ॥ ४८ ॥ परी सूर्यो
दयाचा प्रकाश ॥ न शिरावा ह्मणुनी वाव
त्यास ॥ न देतांही तेजोरास ॥ उगवला हें
कळेची ॥ ४९ ॥ किंवा मधुर वस्तूचा आल्हा
दक वास ॥ दाबून ठेविला असतां पास ॥
मुंग्या माशा सावकाश ॥ शोधीत येती भोंव-
तीं ॥ ५० ॥ तैवि जवळी सदा घोळका ॥
महाराज चरणीं लागती निका ॥ नेती आग्रहें
सद्गुरुसखा ॥ राममारुती महाराज ॥ ५१ ॥
एकदा गोधडीबोवांच्या कीर्तनीं ॥ निरूपण
सांगतां पूर्णपणीं ॥ क्रोधावश बोलती हे
श्रोत्यांनीं ॥ डरविलें कथेसी रंग ये ना ॥ ५२ ॥
श्रोतियांत होते महाराज तयीं ॥ भुभुःकारें

उड्डाण होई ॥ बुवासह पाहती लवलाहीं ॥
पुढती कथेसी रंग आला ॥ ५३ ॥ बोवा गो-
घडे शोधीत येती ॥ श्री सद्‌गुरु मूर्ति ओळ-
खिती ॥ चरणीं मस्तक ठेविती ॥ आनंदळे
बहुपरी ॥५४॥ नित्य नवे नवे चमत्कार।लीला
काय वर्णू सुंदर ॥ तो त्रिकाल ज्ञानाचा बहर ॥
लोकीं वाटे नवल तें ॥ ५५ ॥ ज्ञानरायें रेडा
बोलविला ॥ चांगदेवें वाहना व्याघ्र केला ॥
गोरा कुंभारानें बाळ तुडविला ॥ आश्चर्यकारी
सामर्थ्य ॥ ५६ ॥ एकदां प्रभु पाठारे कायदे
पंडित ॥ कीर्ति ऐकोनि दर्शना येत ॥ नाम
वार्णिनें चर्चा ऐकत ॥ नवल वाटलें त्यांसि
पैं ॥ ५७ ॥ महाराज मुखींचे शब्द चार ॥ ऐ-
कावे हा हेत फार ॥ समर्थ आपण पुरविणार
॥ कृपा व्हावी हे विनंती ॥ ५८ ॥ ऐकोनि
त्यांचा इच्छित हेत ॥ पारमार्थिक चर्चा चालू

करीत ॥ नाम वार्णीत बोध होत ॥ अल्पसह-
वासें सहजचि ॥ ५९ ॥ अमृतमय चर्चा
विषय ॥ वृत्ती बनली त्यांची तन्मय ॥ परता-
वयाची वेळा जाय ॥ भान हरपलें भक्तींत
॥ ६० ॥ शेरडीचे सांईबावा महासंत ॥ त्यां
च्या भेटीस अठराशें बत्तिसांत ॥ तेथ त्रिंबक
कर्णिक येत ॥ आज्ञा ईशावास्य वाचावें ॥ ६१ ॥
ठेवावा मनन ध्यास तेथ ॥ तर्यी महाराज
सान्निध्यांत ॥ देखिलें तें ध्यानांत ॥ कल्याण
मुक्कामीं पुजियेलें ॥ ६२ ॥ ईशावास्याचें नित्य
पठण ॥ आहे का चालू नित्य नेमान ॥ कर्णिकें
महाराजांलागुन ॥ विनंति केली आदरें ॥ ६३ ॥
आहे परी समश्लोकी करून ॥ ठेविली ती
सुधारून ॥ द्यावी तसदी आपणा लागून ॥
देत आहें दयाळा ॥ ६४ ॥ पुढें विस्मृति झाली
महाराजासीं ॥ सा वर्षांनीं दिली त्यांसी ॥

शुद्ध करूनि स्मरणेंसी ॥ अवतार समाप्ति
वेळेला ॥ ६५ ॥ कर्णिकें पाहोनि प्रेमानें ॥
उद्धरले सद्गद अंतःकरणें ॥ महाराज अगाध
ज्ञानानें ॥ पूर्णत्व होते साक्षात् ॥ ६६ ॥
शिरडीस घडलेला वृत्तांत ॥ महाराजें पुसिला
प्रेमांत ॥ साई स्वतांशीं बडबडत ॥ ते सांगा
स्मरणानें ॥ ६७ ॥ त्याचा पूर्ण बोध नव्हता
मना ॥ परी शब्दजाल होतें ध्याना ॥ ती
ओळख तत्क्षणा ॥ महाराजें पटविली ॥६८॥
समश्लोकी भागवत प्रवचन ॥ होतें चाललें
तें स्मरण देऊन ॥ नाथीय समश्लोकी काढून
॥ रूपांतर लिहिवलें ॥ ६९ ॥ कर्णिकाशीं
झाला बोध ॥ वाढला आदर चरणीं
अगाध ॥ साईं महाराजीं नसे भेद ॥
नेत्रां निराळे एकाचि ॥ ७० ॥ शिरडी
मुक्कामीं दर्शनास ॥ महाराज गेले ते वेळेस ॥

आदल्या दिवसापासोनि खास ॥ साईबावा बोलती॥७१॥उद्यां आमुची दिवाळीरे॥सोनियाचा दिन आला रे ॥ जणों भजनाचें शिरलें वारें ॥ साईं मुखीं सारखें ॥ ७२ ॥ दुसरे दिवसा आरती वेळा ॥ राम मारुती पाहोनि डोळां ॥ थांबविला आरती सोहळा ॥ कडाहूनि भेटले ॥ ७३ ॥ कांहीं काळ मुग्ध वृत्ती ॥ एकासनीं बैसल्या उभय मूर्ति ॥ कौतुका आनंद भक्तांप्रति ॥ वाटला तो अद्भुत ॥७४॥ साईं नाथांसी नैवेद्य ॥ मशिदींत नेती ते प्रसिद्ध ॥ तयीं साईं बोलले आज आद्य ॥ नाथ राम मारुतींचा ॥ ७५ ॥ नैवेद्य येतां तांतडी ॥ सोहंकारें हुंगोनि आवडी ॥ मुखीं ग्रास एकाची गोडी ॥ घेतली ती आनंदें ॥ ७६ ॥ उभय संत हातांत हात ॥ घालोनि बैसती प्रेमांत ॥ त्यांचीं बोलणीं त्यांस ज्ञात ॥

आनंद सोहळा दिसतसे ॥७७॥ महाराजांशीं ठेवोनि घेती ॥ अत्याग्रहें रहा ह्मणती ॥ चवदा दिवस उलटल्या वरतीं ॥ ना इलाजें निरोपिलें ॥ ७८ ॥ महाराजां पुसतां समजलें ॥ साई आदिनाथ प्रवर्तले ॥ साईंनीं नाथ संबोधिलें ॥ अवतार नाथ परंपरा ॥ ७९ ॥ महाराज जाण्या आधीं शेरडीस ॥ कांहीं परिचित दर्शनास ॥ साई शिष्यें आग्रहास ॥ पहून विनवीत महाराजा ॥ ८० ॥ साईबावा अंश कोणाचे ॥ आपणा नाथ ह्मणेल त्याचे ॥ सर्वपरी या गूढाचें ॥ पूर्व सर्व सांगणें ॥ ८१ ॥ महाराज हासून सांगती ॥ सर्व नाथ परंपरेचे असती ॥ आदिनाथ ते साई साम्प्रति ॥ साईरूपें प्रकटले ॥ ८२ ॥ आह्मी असों भुजंग नाथ ॥ आमचे सद्गुरु बाळ मुकुंद होत ॥ परी साईंसह ते समान असत ॥

सद्गुरु मूर्ति वंद्य त्या ॥ ८३ ॥ यापरी नाथ मार्गींचा खुलासा ॥ महाराज मुखें ज्ञात झाला खासा ॥ ब्रह्मचर्याकृति भासा ॥ हनुमंत रूप दावित ॥ ८४ ॥ नाथ ह्मणावा हनुमंत गणा ॥ सिद्धरूप अंशात्मक जाणा ॥ मार्ग दावावया अज्ञजना ॥ अवतरले हे निश्चित॥८५॥कोठील असो कोण्या कालचा॥ संतनाम घेतां त्याचा ॥ स्थलकालाचा सर्व खुलासा॥सांगती धर्मपंथासह ॥८६॥ महाराज कट्टे ब्रह्मचारी ॥ ईशनामें बोलती भाषा सारी ॥ हें पाहून ग्रामाधिकारी ॥ ढोंग समजे मनांत॥८७॥एका वेश्येस द्रव्यवशें॥अधिकारदर्पें उद्युक्त विशेषें॥रात्रीं धाडिली मंदिराखासें ॥ श्रीरामाचे निद्रिस्थ ॥ ८८ ॥ जाऊनि महाराजां केलें जागें ॥ स्त्रीभाव चेष्टा सुलभ मार्गें ॥ महाराज हांसोनि ह्मणती जागे ॥

राम शिव नामें उच्चारिती ॥ ८९ ॥ निरूपायें
जातां वाटे ॥ दाह शरीरीं येती कांटे ॥
ज्वरोपद्रव अति फाटे ॥ अधिकाऱ्या निरोप
धाडी ॥ ९० ॥ धांवोनि आला तांतडी अती ॥
महाराज पायीं मस्तकाप्रती ॥ ठेवोनि यांची
क्षमा ती ॥ विनवितसे घडोघडी ॥९१॥ क्षमा
केली महाराज हांसले ॥ कृपादृष्टीनें पाहिलें ॥
तंव वेश्येगृहीं नवल झालें ॥ ज्वरोपद्रव कमी
झाला ॥९२॥ महाराजचरणीं त्याची भक्ति ॥
अत्यंत राहिली प्रेमें ती ॥ पुढें ठाण्यासी
महाराज जाती ॥ तों भेटला तेथेंही ॥ ९३ ॥
विचारपूस करितां सातान्यास ॥ असतों
म्हणाला महाराजांस ॥ महाराज पुसती
मसुरेस ॥ भगवान संतां पाहिलें कीं ॥९४॥
अवश्य घ्यावें त्यांचें दर्शन ॥ ते मौनव्रतें
असती पूर्ण ॥ तें सोडावया मी जाईन ॥

चातुर्मास्यीं अवश्य ॥ ९५ ॥ आज्ञा ऐकून संतांचिया ॥ गेला दर्शना आज्ञेपरी या ॥ चातुर्मास्यीं भेटावया ॥ उत्सुकतेनें राहिला ॥ ९६ ॥ शोधा जातां मसुराग्रामीं ॥ मार्गी कळलें वर्तमान नामी ॥ त्यांच्यापरी वेडे भ्रमी ॥ रात्रीं एक पातले ॥ ९७ ॥ हास्य नाच रंग भले ॥ रात्रींत नाना खेळ केले ॥ पहाट होत निघून गेले ॥ उदयीं भगवान समाधिस्थ ॥ ९८ ॥ ही कथा ऐकल्यावरती ॥ तो अधिकारी ठाण्याप्रती ॥ फिरोनि येतां महाराजांप्रती ॥ वर्तमान सर्व सांगितलें ॥ ९९ ॥ महाराजें हांसोनि लेखिलें ॥ ऐकलें तेंच वर्तलें ॥ तव भावें जें धारिलें ॥ तेंच सत्य असे कीं ॥ १०० ॥ कथेचा या भाग घेतां ॥ योगबळें गेले स्वतां ॥ अंतकाळीं भगवान संतां ॥ भेटून सर्व सोडविलें ॥ १०१ ॥

ऐशा या चौथ्या अध्यायीं ॥ एक तपाची यात्रा पायीं ॥ ईश भाषा जनाठायीं ॥ नाम महिमा संतलीला ॥ १०२ ॥ ऐशापरी चार कामें ॥ चार पुरुषार्थ योग क्षेमें ॥ स्वतः ब्रह्मचर्यी चतुर्थाश्रमीं ॥ चतुर्वर्णाचार ते ॥ १०३ ॥ यापरीस चतुर्थाध्याय ॥ शुक्ल चतुर्थी श्रावणा पूर्ण होय ॥ पुरुषार्थ, वर्ण, आश्रमीय ॥ चहूं बाजूंचा चौकडा ॥ १०४ ॥ इति श्रीराममारुती चरित्रामृत ॥ चतुर्थाध्याय कथा बहुत ॥ वाचा जी निश्चित शुद्ध होत ॥ संतां माझें नमन तें ॥ ॥ १०५ ॥ इति राममारुती चरित्रामृत चतुर्थोध्यायः ॥ ॥ ॥ ॥

## अध्याय ५ वा.

श्रीगणेशाय नमः॥श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरवे नमः ॥ श्रीराममारुती चरित्रामृत गोड ॥ चवथे अध्यायीं ब्रह्मचर्य लीला अवघड ॥ पंचमी अवतार कार्य द्राक्षा घड ॥ दाऊन धाम स्वीकारला ॥ १ ॥ कल्याण भिवंडी वसतिस्थान ॥ परि कार्यभावें तें न राहून ॥ शिष्यजनांच्या प्रेमेंकरून ॥ स्थलें अनेक हिंडले ॥ २ ॥ ठाणें कुलाबा मुंबापुरीं ॥ गुजराथ बडोद्याभ्यंतरीं ॥ नागपुरा पासून रत्नागिरी ॥ सत् कीर्तीनें फिरविलें ॥ ३ ॥ ज्या गावीं होय मुक्काम ॥ तेथ भजनोत्सव अनुपम ॥ नाम महिमा वाढे सुगम ॥ जन चित्ता वळविती ॥ ४ ॥ वृत्ती सहज समाधि स्थिती ॥ वाटे गाढ निद्रा परि जागृती ॥ सबाह्य

अंतरीं नाम उक्ति ॥ राहिली पूर्ण भरून ॥ ५ ॥ जडासी जडाया अंतरीं पुरे ॥ खंड कुठेना ऐसें भरे ॥ भक्ति भावना भरूनी उरे ॥ अंतरंगीं साठवून ॥ ६ ॥ डोळा डोळ्यातें पाहूं न शके ॥ दर्पण देखे तें परकें ॥ निजरूपातें ओळखे ॥ ज्ञानदृष्टी तीच होय ॥ ७ ॥ ऐसी दृष्टी ज्याची झाली ॥ त्याची आपपरता बुडाली ॥ सर्व भूतें त्याचीं झालीं ॥ तोहि होई त्यांचाची ॥ ८ ॥ सदा मुखाशीं रामनाम ॥ किंवा ॐ शिवाय नम ॥ ऐक्यरूपें सप्रेम ॥ द्वैत त्यासीं कोठलें ॥ ९ ॥ अज्ञानत्वें संतलीला ॥ जना चमत्कार वाटे झाला ॥ स्वानुभवाचा जो तो मासला ॥ बोले तेचि चमत्कार ॥ १० ॥ जनचित्ता ज्यांनीं ओळखिलें ॥ तादात्म्य रूपें जाणलें ॥ त्यासी तीन काळ का आगळे ॥ राहतील कोठें कैसे ते ॥ ११ ॥ आत्माज्योति

भूतमात्रांची ॥ केंद्ररूपें ऐक्यतेची ॥ जाणिवेने संदेशवाची ॥ मनोमय विद्युतेनें ॥ १२ ॥ ऐसी जाणीव इतरां कैंची ॥ ती संतमहात्म्या होय साची ॥ त्यांच्या सर्व क्रिया लीलाचि ॥ चमत्कारसे वाटती ॥ १३ ॥ तरी ऐसे चमत्कार ॥ सज्जनांनी कथिले साचार ॥ जे जे घडले त्यांतील सार ॥ वर्णीतसें प्रसंगीं ॥ १४ ॥ दादराशीं अठरासें पस्तिसांत ॥ भजनाकारणें राहिले वस्तीस ॥ पारण्या आर्धी मका फराळास ॥ आणा ऐसें आज्ञापिलें ॥ १५ ॥ वेळा नव्हती ते बाजाराची ॥ गेला घाडीयलेला मळ्याशीं ॥ द्या हो कणसें ह्मणे आह्मांसीं ॥ मूल्य योग्य घेऊनी ॥ १६ ॥ मळेकऱ्यानें कणसें खुडोन ॥ टोपलें भरुनी द्या ह्मणून ॥ मनीं बोले दाम कोठून ॥ आणूं आतां इतक्यांचे ॥ १७ ॥ थांबा ह्मणे

आणूनि देतों ॥ जाऊनि तांतडी पळत येतों ॥
द्यावीं असती त्याचीं ह्मणतों ॥ दावी चवली
मळेकऱ्या ॥ १८ ॥ हांसून घेतली त्यांच्या
हातची ॥ झालें आज मोल यांचें इतुकेंची ॥
ज्या निःशंक बांधून यांची ॥ ठेवूनि मोटली
पाठीवरी ॥ १९ ॥ झालें आश्चर्य तेवेळां ॥
मळेकरी स्पष्ट ठरलेला ॥ मळ्याशीं कोणी
गेलेला ॥ चोर बनवी तयाशीं ॥ २० ॥ द्वाद-
शीस ऐसा फराळ ॥ भोजना आधीं नसे
केवळ ॥ सर्वां वाटलें मोठें नवल ॥ चमत्का-
र कीं दाविला ॥ २१ ॥ शके अठरासें
तेहतिसांत ॥ बाळापुरीं वास्तव्य
होत ॥ आवडी दर्शना एक येत ॥ त्यासी
अष्टविनायक करीं जा ॥ २२ ॥ आज्ञा वद्य
फाल्गुनी चतुर्दशीस ॥ रामनवमी येई खास॥
साळाप्रमाणें उत्सवास ॥ भेटें मज निश्चयें

॥ २३ ॥ गुर्वाज्ञेसीं मानुनी त्वरित ॥ गण
नाथाचीं दर्शनें घेत ॥ सांग पूजा दक्षिणा
पूरित ॥ यथासांग करूनियां ॥ २४ ॥ आज्ञे-
नुरूप आले घरा ॥ हिशोब पहातां झाला
सारा ॥ नेल्या रकमेचा शिलकेंत थारा ॥
होवोनि खर्च पुनरपि ॥ २५ ॥ घेतले तितुके-
चि परत आले ॥ वाटखर्चासहि तपासिलें ॥
नाहीं दिधले किंवा घेतले ॥ तरी खर्चले ते
शिलकी कसे ॥ २६ ॥ अठराशें एक उन
चाळिस ॥ निजगुरु तिथीला कल्याणास ॥
आनंद वाटला सर्वांस ॥ नवल मोठें वर्तलें
॥ २७ ॥ पारनेरकर श्रीकेशवस्वामी ॥ होते
संगातीं दिवस नामीं ॥ पूजन आरती ते सं-
गमीं ॥ आला निरोप घरांतून ॥ २८ ॥
दोघां मुलांनां ज्वर आला ॥ गांठी
दिसती जांघेला ॥ केवळ मृत्यूचा घाला ॥

एकतांचि भय वाटे ॥ २९ ॥ उत्सवास्तव
पाहुणीं तीं ॥ महाराज गेले स्वामींसहितीं ॥
त्वरित जाउनी त्यांतें पाहती ॥ सर्वांगीं हात
फिरविला ॥३०॥ तीर्थ द्यावें दीन गुरूचा ॥
जयजय रघुवीर शब्दें साचा ॥ भाव कळवि-
ला अंतरींचा ॥ चिंता नको हें जाणा ॥३१॥
सारी रात्र भजन चाले ॥ शीर्षी उडाणी झळा-
ळे ॥ वीज जैसी तये वेळे ॥ मुलें विरामय
जाहलीं ॥ ३२ ॥ विषारी साथी तापबाधा ॥
कालपाशचि नसे वांधा ॥ रामभजनें केला चेंदा
॥ कालपाश तोडीला ॥३३॥ संतमहात्म्याची
योगकला ॥ दुरवी झणी कलिकाला ॥ हा
प्रत्यय सर्वां आला ॥ दृष्टीपुढें घडलेलें ॥३४॥
यापरी प्रसंगीं चमत्कार ॥ सहज लीला दा-
विली साचार ॥ जना होई नवल फार ॥
वितंडातें दवडिती ॥ ३५ ॥ षड्स अन्नें

नाना परिचीं॥भक्तिभावें करिती साचीं॥झप-
झप जेवणें घेती न रुची ॥ वाढा पुरे ह्मणणें
नसे ॥ ३६ ॥ एकदा हमरापुर गांवीं ॥ कुळ-
कर्ण्यानें भक्तिभावीं ॥ भोजनालाडूप्रेमें क-
रवी ॥ वाढपे वाढिती आग्रहें ॥ ३७ ॥ मागणें
नाहीं पाहोन ॥ खाववूं भलें पोट भरून ॥ न
टाकिती कधीं उच्छिष्ट अन्न ॥ म्हणुनि प्रेमें
वाढिती ॥ ३८ ॥ परब्रह्म अन्न आनंदानें ॥
सढळपणें जेविती नेमानें ॥ देखूनि हें मंडळी-
नें ॥ लाडू मोठे बांधले ॥ ३९ ॥ अंतरीं महा-
राजें जाणलें ॥ वाढिती तितुके उडविती
भले ॥ ऐसें होतां लाडू सरले ॥ क्षमा या-
चिली ते वेळां ॥ ४० ॥ यांच परीचा एक
प्रकार ॥ कल्याणास झाला साचार ॥ ग-
णेश चौतीचा सण सुंदर ॥ भोजन झालें
अतिकाळीं ॥ ४१ ॥ रात्रसमयीं आग्रहें पु-

सिलें ॥ एकभुक्त राहणें न चांगलें ॥ प्रकृति-
सीं थोडें भलें ॥ पाणी पिण्या आधार ॥४२॥
तयीं महाराजें दर्शविलें ॥ मारुती तीन आणा
भले ॥ जाउनी घरांत पाहिलें ॥ तों असती
लाह्‌ तीनचि ॥ ४३ ॥ ठाणें मुक्कामीं विचित्र
लीला ॥ राहिल्या घरीं महाराज वस्ती-
ला ॥ स्नानासहि पाणी सांडण्याला ॥
लागे विदित सर्वांतें ॥ ४४ ॥ होते उतरले
जयाच्या घरीं ॥ ठरविलें त्यानें मनाभ्यंतरीं
॥ पाणी पट्टी बिऱ्हाडावरी ॥ नित्याहुनी न
घेणें ॥ ४५ ॥ ऐसा करूनी मनाशीं विचार ॥
महाराजां राहविलें साचार ॥ पूर्ण मास होतां
पाहे झडकर ॥ खर्च नेहमीप्रमाणें ॥ ४६ ॥
शंका मनीं भरली पूर्ण ॥ जलमापक बिघड-
ल्याची जाण ॥ तपासा अंतीं आलें कळून ॥
यंत्र, काम करि योग्य ॥ ४७ ॥ एक मास

प्राणी बहु खर्चून ॥ पट्टी नाहीं अधिक ऊन ॥ आश्चर्यभरें झालें मन ॥ चमत्कार बोलती ॥ ४८ ॥ कित्येकां अनुभव आले ॥ निजगृहीं जें वर्तलें ॥ दर्शना जाता सहज बोलें ॥ खूण पटे सहजाचि ॥ ४९ ॥ केव्हां कोणा आज्ञापिती ॥ फलपुष्पाची जाणवती ॥ दुर्मिळ असे जें ते वख्तीं ॥ मिळे सहज इच्छेपरि ॥ ५० ॥ एका दंपत्याचे मनीं ॥ सद्गुरुतें पुरण घालूं भोजनीं ॥ ऐसें होतें बहुदिनीं ॥ होता भावें विचार ॥ ५० ॥ तदनुसारें आले घरा ॥ परी नव्हता तो योग खरा ॥ तात्काल येणें संचारा ॥ दुःख वाटलें उभयांतें ॥ ५२ ॥ केला मनाशीं विचार पूर्ण ॥ उदयिक पुरणपोळी करून ॥ नैवेद्य दाऊं पूजा करून ॥ प्रतिमेसीं साचार ॥ ५३ ॥ तो वृत्तांत अकस्मात ॥ महाराज उभयांतें कळवित ॥

पोळी आह्माशी निश्चित ॥ पोंचली ती खास कीं ॥ ५४ ॥ शके अठराशें सदुतिसात ॥ विनाविलें ताह्माण्यांनी प्रेमयुक्त ॥ वडिलांवेळीं कृपावंत ॥ प्रसाद आह्मा दीधला ॥ ५५ ॥ आतां एकदां कृपाकरून ॥ मुलांबाळां प्रसाद देऊन ॥ अभयकर हा शिरीं ठेवून ॥ धन्य आह्मा करावें ॥ ५६ ॥ चार दिवसां आधीं केली विनंती ॥ तेच दिनीं कामगिरी निकटी ॥ आली पाहून कष्ट चित्तीं ॥ शोधिती मार्ग सद्भावें ॥ ५७ ॥ झाला सहजीं चमत्कार ॥ नव्हत्या सोयी त्या तयार ॥ पुरविली इच्छा अनिवार ॥ दृढ भावने परीस ॥ ५८ ॥ संत-पदाच्या दर्श-नाची ॥ दृढ इच्छा शुद्ध प्रेमाची ॥ संकटें वारिती साचीं ॥ मनोमयीं सहज ते ॥ ५९ ॥ ऐसिया परी अनेक लीला ॥ केल्या, नाम-

महिमा वाढविला ॥ चतुर्मास दादराला ॥
शके अठराशें चाळिसीं ॥ ६० ॥ ऐसियापरी
चमत्कार करून ॥ जनीं नाममहिमा वाढ-
वून ॥ एके दिनीं संदेश पूर्ण ॥ साईबाबांचा
पोंचला ॥६१॥ सरतां श्रावण एक दिन॥दोन
पारसिक शोध काढोन ॥ बोलती महाराजां
भेटून ॥ झाला दृष्टांत साईचा ॥ ६२ ॥ शिर-
डीशीं दर्शना न येतां ॥ भेटावें राममारुती
संतां ॥ निरोपावें त्यांसी तत्वतां ॥ जावें
दादरा शोधीत ॥ ६३ ॥ ते बोल पडतां कानीं ॥
जैसें पूर्वस्मरण व्हावें क्षणीं ॥ तेंवी तत्काल
होवोनी॥झाला वृत्तींत बदल तो॥६४॥प्रसन्नता
मुखावरी ॥ तेव्हांपासुन दिसली भारी ॥
शिष्यांठायीं अनिवारी ॥ प्रेमा अति वाढला
॥ ६५ ॥ तेथवांसि जाती जये घरीं ॥ मागून
घेती दधि करीं ॥ शर्करेसह प्रेमभरी ॥

न्हता क्रम तो चालवला ॥ ६६ ॥ निरोप
आतां शेवटचा ॥ जाणून घेती शिष्यांचा ॥
अंतरीं जें वसे त्याचा ॥ बोध इतरां कोठून
॥ ६७ ॥ कल्याणासीं सालापरी ॥ गणेशो-
त्सवाभ्यंतरीं ॥ भजनरंग रात्रभरी ॥ अने-
कांकडे जाहले ॥ ६८ ॥ त्यानंतर ज्वरोपद्रव
देहकष्ट ॥ सात दिवसांत झाला अनिष्ट ॥
वद्य भाद्रपद नवमी श्रेष्ठ ॥ प्रियवारीं विस-
र्जन ॥ ६९ ॥ पाचांचा पांचां ठेविला ॥ स्व-
तः कैवल्यधाम गांठिला॥ऐहिकातें लोटला ॥
खूण साईंची मिळताच ॥ ७० ॥ अठरा दि-
वसांचें अंतर ॥ उभय संतांमाजि साचार ॥
इतरां वाटे नवल फार ॥ तत्व याचें तेच
जाणो ॥ ७१ ॥ शके अठराशें चाळीस ॥
समाधि-काल कल्याणास ॥ बाल्य गेलें
जेथ विशेष ॥ तेंचि स्थल पूर्ततेचें ॥ ७२ ॥

यात्रा पुरती ओळखिली ॥ निजानंदा आली उकळी ॥ कार्यकारणाची पूर्तता झाली ॥ व्यर्थ मोहीं न राहती ॥ ७३ ॥ ज्यांनीं षड्रिपूतें तुडाविलें ॥ दृष्टी भयानें पळविलें ॥ मायेपासूनि दुरावले ॥ त्यांसी मृत्यु कोठला ॥ ७४ ॥ जीर्ण होतां जैसा पंजर ॥ देती टाकूनि मार्गीं सत्वर ॥ तैसा पंचत्वाचा जर्जर ॥ सोडून देती आनंदें ॥ ७५ ॥ संतचरित्र लेखनाची ॥ होती इच्छा बहु दिवसांची ॥ सहज योग आला साची ॥ बाळमित्र भेटले ॥७६॥ वसिष्ठ गोत्री ब्राह्मणे ॥ गोपालात्मज भास्करनामें ॥ वार्तालापीं संत महात्मे ॥ नामें वर्णिले कथेसह ॥ ७७ ॥ या सुयोगें आनंदले ॥ तांतडीनें हातीं घेतलें ॥ चित्त बुद्धीशीं गोठलें ॥ लिहविती निमित्यें ॥ ७८ ॥ वर्णावयासी सत्कीर्ति ॥ त्यांनींच दिली सहज

स्फूर्ति ॥ महनीय आंगीं संस्कृति ॥ न बोबडे
परि गोड ॥ ७९ ॥ जनमुखींच्या सत्यकथा ॥
श्रींच्या गद्यचरिताची साह्यता. ॥ श्रावण
वद्य नवमीस पूर्णता ॥ अष्टोत्तर शत पंचे-
चाळिसीं ॥ ८० ॥ वाजसनेयी पाठक इत्यु-
पनाम ॥ रामचंद्रात्मज हरि शर्मा नाम ॥
आयुर्वेदीय व्यवसायी पूर्ण ॥ संतपदाशीं
तल्लीनत्वें ॥ ८१ ॥ श्री राममारुती चरित्रामृत
॥ पंचमोध्यायीं चमत्कार अद्भुत ॥ वाचोत
नित्य भक्तियुक्त ॥ सन्मार्गाचें दर्पण ॥ ८२ ॥
संतकथा असती पुण्यप्रद ॥ भक्ति-वैरा-
ग्याचा बोध ॥ ज्ञानदेवा परम शुद्ध ॥ संत-
माहात्म्य चरित्रांतीं ॥ ८३ ॥ ॥ ॥

॥ इति श्री राममारुतीचरित्रामृत संपूर्ण ॥

१८५



## श्री सद्गुरुराममारुती महाराजांची आरति.

जय जय जय महसंता, वर्णूं किती महता ॥ तारक नाम मार्गा वळविशी जनचित्ता ॥ जय जय जय ॥ निर्मळ षड्रिपुमद्या वाणीशी बंधा ॥ ईश नामा वाचुनि ना धेशी कदा ॥ श्रीराम-मारुति नामें संतपदा जाशी ॥ सत्‌शिष्यातें चाहुनि गुरुमात्रा देशी ॥ जय जय जय ॥१॥ प्रवृत्ति मोहाशी भस्मीभुत केला ॥ आशा पाशा बांधुनी जळधी बुडविला ॥ ब्रह्मचर्या गाठी वितरागी उटी ॥ अंतर बाह्येल्याही सुंदर गोमटी ॥ २ ॥ वानुं किती सद्गुणता सर्वांशीं समता ॥ जयजयकारें आरती ओंवाळित आतां ॥ सद्गुरु वरदा धृतकर शिष्योत्तम ज्ञाता ॥ निजरूपीं तल्लीनता रघुवीर भक्ता ॥ ३ ॥ भजनारंगी वृत्ती उंच